*येणाऱ्या क्रांतीकारी वादळांची तयारी करूया!*

# नोटबंदी
# खरा उद्देश्य
# आणि
# खोटे दावे

---

हिंदुस्थानाच्या कम्युनिस्ट गदर पार्टीचे

प्रकाशन, 8 जानेवारी 2017

# नोटबंदी खरा उद्देश्य आणि खोटे दावे

## हिंदुस्थानाच्या कम्युनिस्ट गदर पार्टीचे प्रकाशन, 8 जानेवारी 2017

2016ची वर्षाखेर सरकारने जाणीवपूर्वक निर्माण केलेल्या रोकड पैशाच्या घोर संकटाबरोबर झाली. 8 नोव्हेंबर ला नोटबंदीच्या नावाखाली जी मोहीम सुरू केली गेली होती, त्यामुळे चारी बाजूला हाहाःकार माजला आहे आणि समाजातील उत्पादनाच्या अनेक क्षेत्रांचा मोठ्या प्रमाणात विनाश झाला आहे.

8 नोव्हेंबर, 2016 ला चलनात असणाऱ्या नोटांच्या 86 टक्के नोटा एका झटक्यातच अवैध ठरविल्या गेल्या. लोकांना आपल्या जुन्या नोटा बँकामध्ये जमा करण्यासाठी 50 दिवसांचा वेळ दिला गेला. असा समाज जेथे अधिकतर लोक आपल्या उपजीविकेसाठी रोकड पैश्यातील व्यवहारावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत, इथे नोटबंदीचा त्वरीत आर्थिक परिणाम वास्तविकपणे खूपच विनाशकारी झाला आहे..

वेतन देण्यासाठी रोकड रकमेच्या अभावामुळे लाखों—लाखों रोजंदारीवर काम करणाऱ्या तसेच ठेक्यावर काम करणाऱ्या कामगारांना कामावरून काढून टाकले गेलेय. देशातील कितीतरी ठिकाणी शेतकरी रब्बी पिकांच्या लागवडीसाठी जरूरी वस्तू खरेदी करण्यात असमर्थ ठरलेत. घाऊक आणि किरकोळ व्यापार खूप कमी झाला आहे. बांधकाम, पर्यटन, परिवहन, छोटे व मध्यम उद्योग आणि सेवा, जे रोकड व्यवहारावर निर्भर आहेत त्यात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. निकडीची औषधे विकत घेण्यासाठी पैसे नसल्यामुळे काही लोकांना प्राणही गमवावे लागले आहेत.

दुसरीकडे, नोटबंदीमुळे अनेक हिंदुस्थानी मक्तेदार घराण्यांना आणि विदेशी बहु—राष्ट्रीय कंपन्यांना बेसुमार कमाई करण्याच्या संधी मिळाल्या आहेत. ह्यामध्ये दूरसंचाराच्या मक्तेदार कंपन्या तथा आताच सुरू केल्या गेलेल्या पेमेंट बँका यांचा समावेश आहे. इंडिया इंकॉर्पोरेटेडच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मक्तेदार भांडवलदारी घराण्यांच्या प्रमुखांनी ह्या पावलाचे जोरदार स्वागत व प्रशंसा केली आहे. बिझनेस स्टँडर्ड वृत्तपत्राने 2 जानेवारी 2017 मधील रिपोर्ट मध्ये असे म्हटलय की हिंदुस्थानातील मोठमोठ्या कंपन्यांच्या 25 प्रमुखांपैकी (सी.ई.ओं.पैकी) 21 जणांनी सरकारी कामकाजावर आपला संतोष व्यक्त केला होता तसेच त्यांतील बहुतेक जण 2017 मध्ये आपली गुंतवणूक वाढविण्याची उमेद करत आहेत.

अनेक लोकांचे मृत्यू, करोडो नागरिकांची रोजी—रोटी हरवणे, दिवसभर लांबच लांब रांगेत उभे राहून तासनतास वाया जाणे, रोकड पैसे काढण्यावर लावलेली बंधने — ह्या सगळ्याला वैध ठरविण्यासाठी असे म्हटले जातेय की *"दूरगामी फायद्यासाठी तात्पुरते कष्ट"* सहन करावे लागतील. नववर्षाच्या एका दिवसापूर्वीच्या संध्याकाळी पंतप्रधानांनी बँकांद्वारा दिल्या गेलेल्या कर्जामध्ये तऱ्हेतऱ्हेच्या तथाकथित सुटींची घोषणा केली आणि ह्याला गरीब आणि मेहनती लोकांना नोटबंदीद्वारे मिळणाऱ्या लाभांची प्रथम—सूची म्हणून प्रस्तुत केले.

दूरवर ह्या पावलाचा काय फायदा होणार आहे व कोणाला? कोणत्या वर्गाला याचा खराखुरा फायदा होईल आणि कोणत्या वर्गाचे यामुळे नुकसान होईल? अचानक आपल्यावर थोपल्या गेलेल्या ह्या वित्तीय कमी खर्चाच्या कार्यक्रमाचा खरा उद्देश्य काय आहे?

ह्या पत्रिकेचे तीन भाग आहेत. पहिल्या भागात नोटबंदीच्या खऱ्या कारणांना समजून त्यांचा पर्दाफाश करण्यासाठी तथ्यांचे आणि गतीविधींचे विश्लेषण केले गेले आहे. दुसऱ्या भागामध्ये सरकारी दावे – की नोटबंदीमुळे गरीब–श्रीमंत असमानता, भ्रष्टाचार व आतंकवाद नष्ट होतील – ह्याचे टीकात्मक मूल्यांकन केले गेले आहे. तिसऱ्या भागात हे सांगितले गेलेय की कम्युनिस्ट गदर पार्टीच्या अनुसार, ह्या समस्यांचा खराखुरा उपाय काय आहे व तसेच त्यासाठी मुख्य कार्यक्रम काय असायला हवा.

## खरा उद्देश्य

जेव्हा जवळपास 15 लाख करोड रुपयांच्या जुन्या नोटांवर बंदी लावण्यात आली तेव्हा पहिल्या 50 दिवसांत ह्यांच्या अर्ध्याहून कमी मूल्याच्या नवीन नोटा चलनात आणण्यात आल्या. भारतीय रिझर्व बँक आणि केंद्रीय वित्त मंत्रालय, दोघांनीही असं म्हटलंय की हे विचारपूर्वक बनविलेल्या योजनेनुसार करण्यात आले आहे.ह्यातून काय दिसून येते? हेच दिसून येते की जेव्हा माजी पंतप्रधान मनमोहन सिंगानी नोटबंदीला एक "खूप मोठी चूक" म्हटले होते, तेव्हा ते चूक होते. जेव्हा माजी वित्तमंत्री चिदंबरम ह्यांनी नोटबंदीला "प्रचंड कुनियोजन" म्हटले तेव्हा तेही चुकीचे होते. सत्य तर हे आहे की खूप वेळासाठी रोख रकमेची प्रचंड कमी **खूप विचारपूर्वक** करण्यात आली, जेणेकरून लोकांना रोकड व्यवहाराऐवजी डिजिटल व्यवहार करण्यासाठी **मजबूर** केले जाऊ शकेल.

नोटबंदीचा मुख्य हेतू आहे हिंदुस्थानी व विदेशी मक्तेदार भांडवलदार अब्जपतींच्या हितांनुसार "वित्त क्षेत्रात सुधारणा" तेजीने लागू करणे. ह्याचा हेतू आहे लोकांना आपली पूर्ण बचत बँकेत जमा करून, रोकड व्यवहार हटवून डिजिटल व्यवहार तंत्रावर अवलंबून राहण्यासाठी भाग पाडणे, जेणेकरून मक्तेदार भांडवलदार जास्त शक्तिशाली होऊ शकतील आणि जास्त कुशलतेने व विस्तृतपणे लोकांची बचत लुटू शकतील.

86 टक्के जुन्या नोटा बाद केल्यामुळे ठोस परिणाम असा झाला आहे की 13 लाख करोड रुपये जनतेच्या हातांतून निघून बँकेत जमा झाले आहेत. बँकांमध्ये अचानकपणे लोकांद्वारे जमा केली गेलेली प्रचंड रक्कम आली आहे जिच्यावर फारच कमी व्याजदर आहे, व रोख रक्कम काढण्यासाठी कठोर अटी आजही लागू आहेत. प्राप्त धनातील काही हिस्सा आपल्या भांडारात ठेवून, बँका बाकी धनाला कर्जाच्या स्वरूपात देऊ शकतात आणि आपल्या फायद्यांमध्ये खूप वृद्धी करू शकत आहेत.

वृत्त आहे की हिंदुस्थानच्या एक सर्वात मोठ्या मक्तेदार घराण्याचे प्रमुख, मुकेश अंबानींनी पंतप्रधानांमार्फत घोषित नोटबंदीची प्रशंसा करत असं म्हटलंय की, "त्यांनी एका पावलाने संपूर्ण अनुत्पादक धनाला उत्पादक प्रयोगात आणले आहे. ह्यामुळे अर्थव्यवस्थेत कर्जाचा प्रवाह अजून जोरात वाहू लागेल....". जेव्हा मुकेश अंबानी "उत्पादक प्रयोगाच्या" गोष्टी करतात तेव्हा त्याचा अर्थ आहे की आपल्यासारख्या मक्तेदार भांडवलदारांच्या अधिकाधिक नफ्यासाठी उत्पादन करणे.

जनतेला डिजिटल व्यवहार प्रणालीचा हिस्सा बनण्यासाठी मजबूर करून, हिंदुस्थानी व विदेशी मक्तेदारी भांडवलदार आपल्यासाठी बेसुमार नफ्याच्या एका नवीन स्त्रोताची उमेद करत आहेत, ज्याचा आतापर्यंत पूरा फायदा त्यांनी उचलला नव्हता. ठीक 9 नोव्हेंबर पासूनच तमाम डिजिटल व्यवहार कंपन्या आपल्या सेवांच्या जाहिराती देऊ लागल्या. अशा डिजिटल व्यवहार सेवा पुरविणाऱ्या बँका व कंपन्या प्रत्येक देवघेवीवर 2% शुल्क वसुलीची अपेक्षा ठेवून आहेत. हे शुल्क आजवर जनतेला सामान विकणाऱ्या दुकानदारांकडून वसूल केले जात आहे. जेव्हा डिजिटल देवाण–घेवाण प्रचलित होईल तेव्हा हे शुल्क लोकांनी वस्तू खरेदी करण्यासाठी दिलेल्या किंमतीवर आकारले जाईल.

मुकेश अंबानींच्या रिलायन्स जिओ कंपनीला 10 नोव्हेंबरला एक देवघेव बँक (पेमेंट बँक) चालविण्याचा परवाना मिळाला आणि ही कंपनी डिजिटल देवाण–घेवाण सेवांच्या बाजाराचा सर्वात मोठा हिस्सा बळकाविण्याची अपेक्षा करीत आहे. रिलायन्स जिओ त्या पेमेंट बँकेला भारतीय स्टेट बँके सोबत मिळवून एक संयुक्त कारभाराच्या स्वरूपात उघडवू पाहत आहे. पेमेंट बँकेचे परवाने अजून काही कंपन्यांनाही

मिळाले आहेत, ज्यात बिर्ला समूहाची आइडिया मोबाईल, मित्तल समूहाची एअरटेल आणि टाटा व चीनी समूह आलीबाबाची पेटीएम सामील आहेत.

जगातील एक सगळ्यात मोठी कन्सल्टंसी (सल्लागार) कंपनी, बॉस्टन कन्सल्टिंग ग्रूपच्या एका रिपोर्टनुसार  हिंदुस्तानच्या डिजिटल देवघेव उद्योगामध्ये, पुढील 5 वर्षांत 500 अब्ज डॉलर (वार्षिक सकल उत्पन्नाचा एक चतुर्थांश हिस्सा) वार्षिक उलाढालीची अपेक्षा केली जात आहे. ह्याचा अर्थ आहे प्रतिवर्षी 10 अब्ज डॉलर, म्हणजेच 65000 करोड रुपयांचा संभाव्य लाभ.

जर मक्तेदार भांडवलदारांना डिजिटल देवघेवीतून संभाव्य फायदा मिळवायचा असेल, तर कमीत कमी 50 करोड हिंदुस्तानी लोकांना दैनिक व्यवहारात रोकड पैशाऐवजी ह्या किंवा त्या प्रकाराच्या बिना–रोखीच्या देवाण–घेवाण माध्यमाचा अवलंब करावा लागेल. अधिकतर हिंदुस्थानी लोकांना आपल्या सवयी बदलण्यासाठी प्रवृत्त करायला खूप जास्त वेळ लागला असता. म्हणून मक्तेदार घराण्यांनी निर्णय घेतला की लोकांच्या हातून रोकड काढून घेणे, हा या प्रकियेला तेजीने पुढे नेण्याचा सर्वात उत्तम मार्ग आहे.

रोकड देवाणघेवाणी ऐवजी डिजिटल देवाण–घेवाणीकडे वाटचाल करणे – हा अंग्लो–अमेरिकी साम्राज्यवादी आणि विश्व बँक,  बिल अँड मेलिंडा गेट्स फाऊंडेशन व अन्य दानकर्त्या संस्थांद्वारे बढावा दिलेल्या तथाकथित *शासन सुधार कार्यक्रमाचा* हिस्सा आहे. असं दिसतंय की हा सर्वांच्या हितासाठी एक प्रगतीशील अजेंडा आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र ह्याचे सर्वात मोठे लाभार्थी भांडवलदार अब्जपतीच आहेत.

जर सर्वच किंवा अधिकाधिक आर्थिक व्यवहाराचा रेकॉर्ड ठेवण्यात येऊ लागला, आणि याची सूचना राज्याला उपलब्ध करून देण्यात आली, तर जनतेकडून कर तथा विविध सेवाशुल्क वसूल करण्याचा संभाव्य आधार खूप विस्तृत होऊ शकतो. ह्याव्यतिरिक्त प्रत्येक व्यक्तीबाबत विस्तृत सूचनांचे मोठ–मोठे डाटाबेस तयार होतील, ज्याचा वापर लक्ष्याधारित जाहिराती, लक्ष्याधारित राजनीतिक प्रसार आणि क्रांतीच्या संकटाला दूर करण्यासाठी केला जाऊ शकतो.

विक्रय वस्तूंच्या उत्पादन आणि देवाण–घेवाणीच्या लांबलचक इतिहासात पैशांची विविध रूपे राहिली आहेत – कधी धान्य तर कधी गुरेढोरे, कधी सोने तर कधी नाणी किंवा कागदी नोटा. कागदी पैशांच्या ऐवजी डिजिटल पैशांची देवाण–घेवाण ह्याच दिशेने एक विकासाचे पाऊल आहे, ज्याबाबत कामगार वर्ग आणि मेहनती लोकांना कोणताच आक्षेप नाहीये. आक्षेप या गोष्टीवर आहे की बँक व्यवस्था आणि राज्यावर लोभी मक्तेदार भांडवलदारांचे वर्चस्व बनले आहे, ज्यामुळे या प्रौद्योगिक विकासाचा वापर करून अल्पसंख्यांक मक्तेदार भांडवलदार मेहनत करणाऱ्या बहुसंख्यकांचे शोषण व विस्तृत लुटीला अमाप वाढवू शकतील.

2008 च्या जागतिक आर्थिक संकटानंतर, जेव्हा अमेरिका तसेच काही युरोपीय देशांमध्ये सरकारी बजेटमधून धन काढून मोठ–मोठ्या बँकांना बुडण्यापासून वाचविण्यात आले होते, तेव्हा लोकांनी मोठ्या प्रमाणावर त्याचा विरोध केला होता. लोकांनी हा प्रश्न उपस्थित केला होता की जनतेद्वारे जमा केलेल्या धनाची सट्टेबाजी करून वारंवार नुकसानीत गेलेल्या व डबघाईला येणाऱ्या भांडवलदारी बँकांना वाचविण्यासाठी जनतेचे धन का बरं वापरले जावे? अमेरिका व अन्य भांडवलदारी देशांतील कामगार वर्ग आणि लोकांनी हा रास्त प्रश्न विचारला होता.

2009 मध्ये जगातील प्रमुख साम्राज्यवादी ताकदींनी मोठ–मोठ्या बँकांना डबघाईला येण्यापासून रोखण्यासाठी विविध उपाय काढण्यासाठी, एक फायनान्शियल स्टेबिलिटी बोर्ड (आर्थिक स्थिरता बोर्ड–एफ.एस.बी.) ची स्थापना केली होती. एफ.एस.बी ने अर्थव्यवस्थेच्या स्थिरतेला सुनिश्चित करण्यासाठी एक **"धन जमविण्याच्या"** रणनीतीचा प्रस्ताव केला होता. बँकांना डबघाई पासून वाचविण्यासाठी सरकारी बजेट मधून धन काढण्याऐवजी, ह्या *''धन जमविण्याच्या''* धोरणानुसार हे प्रस्तावित केले जात आहे की बँकेतील लोकांच्या बचतीच्या एका हिश्श्याला लुटण्यात यावे व त्या पैशांचा वापर करून बँकांना डबघाई

पासून वाचविण्यासाठी वापरले जावे. या लुटीला न्यायोचित ठरविण्यासाठी नवा कायदा बनविण्याची शिफारस केली जात आहे.

ह्या रणनीतीचे पहिले ठोस उदाहरण 2013 मध्ये सायप्रस येथे दिसून आले. स्वतःच्या खात्यात जमा असलेल्या पैशांमधून किती रक्कम लोक काढू शकतील यावर बंधन घालणारे कायदे पास करण्यात आले आणि याप्रकारे, बँकींग संकटासाठी जबाबदार भांडवलदारांच्या अपराधांसाठी जनतेकडून वसुली करण्यात आली. ग्रीस मधील मोठ्या बँकांनी पूर्ण जनतेवर आर्थीक बंधने लादली, आणि खूप वेळासाठी लोकांना बँकेत जमा असलेले स्वतःचेच पैसे काढण्यापासून वंचित करण्यात आले.

हिंदुस्थानी राज्य समवेत जी–20 समूहाने 2014 साली या रणनीतीचे अनुमोदन केले. वित्त मंत्रालयाद्वारे संघटित एका समितीने 21 सप्टेंबर 2016 ला नोट–बंदीच्या बरोबर दोन आठवड्याआधी, फायनान्शियल रेजोल्युशन अँड डिपॉझीट इंशूरंस बिलचा मसुदा प्रस्तुत केला. या प्रस्थावित बिलामध्ये "फायनान्शियल रेजोल्युशन अँड डिपॉझीट इंशूरंस कार्पोरेशन" गठीत करण्याची योजना सादर करण्यात आली आहे, ज्यानुसार जनतेने बँकेत जमा केलेल्या धनाच्या सुरक्षिततेवर "यथोचित बंधने" लादण्याचा अधिकार या कॉर्पोरेशन ला देण्यात आला आहे.

या साऱ्या तथ्यांतून स्पष्ट होतंय की कर्ज बुडवणाऱ्या मोठ–मोठ्या भांडवलदारांनी बँकिंग क्षेत्रात जे संकट उत्पन्न केले आहे ते संकट दूर करण्यासाठी, लोकांकडून पैसे वसूल करण्याच्या रणनीतीचा नोटबंदी एक हिस्सा आहे. भांडवलदारांनी बुडविलेली प्रचंड कर्जे तसेच बँकांमधील ठेवी आणि कर्जे यात झालेली घट, यामुळे हिंदुस्थानमधील बँकिंग क्षेत्र गंभीर संकटात सापडले आहे. या क्षेत्राला या संकटातून बाहेर काढण्यासाठी लोकांच्या पैशाची लूट करण्याची ही योजना आहे. नोटबंदी मुळे बँकांमध्ये अमाप पैसा जमा झाला आहे आणि पैसा काढण्यावर कठोर बंधने लादली गेली आहेत, जेणेकरून येत्या दिवसांमध्ये कर्ज देणे बँकांना अजून जास्त फायदेशीर होऊ शकेल.

2017 मध्ये नवीन घरांच्या विक्रीमध्ये अपेक्षित वृद्धी आणि गाड्या खरेदीसाठी स्वस्त कर्ज यामुळे जागतिक आणि हिंदुस्थानी मक्तेदार कंपन्या खूप खुश आहेत. मक्तेदार कंपन्या नोट–बंदीने झालेल्या विनाशाचा स्वत:च्या हितांसाठी, विभिन्न क्षेत्रांमध्ये आपला प्रभाव अजून विस्तृत करण्यासाठी वापर करू इच्छित आहेत.

नववर्षाच्या पूर्वसंध्येला पंतप्रधानांनी ज्या तथाकथित सवलतींची घोषणा केली होती, वास्तविकपणे त्या कोणत्या सवलती नाहीतच. गरीब शेतकऱ्यांना बँकेतून घेतलेल्या कर्जावर जो कमी व्याजदर दिला जातो तो बचत–खात्यातील पैशावर बँकाद्वारे दिल्या जाणाऱ्या व्याजदराहून जास्त आहे. दुसऱ्याच शब्दामध्ये, आधी लोकांना कमी व्याजदरात बँकामध्ये पैसे जमा करण्यासाठी मजबूर केले जात आहे आणि आता आपल्याला अस सांगितले जातंय की आपला स्वतःचाच पैसा आपल्याला उच्च व्याजदराने कर्ज म्हणून उपलब्ध होणार आहे. आणि या लुटीला नवीन वर्षाची भेट असे प्रस्तुत केले जात आहे!

संक्षिप्तपणे, नोट–बंदीचा खरा उद्देश आहे कर्जबुडव्या भांडवलदारांद्वारे निर्माण झालेल्या संकटाचे ओझे मेहनत करणाऱ्या लोकांच्या खांद्यावर लादणे, जेणेकरून मूठभर अतिश्रीमंत अधिक वेगाने जास्त श्रीमंत बनू शकतील. सर्व जगभरात बढावा दिल्या जात असणाऱ्या आर्थिक क्षेत्रातील सुधारणांच्या कार्यक्रमाचा हा एक हिस्सा आहे. ज्याच्या सहाय्याने वित्तपुंजी आपल्या मनमानीने नागरिकांना लुटू शकेल.

## खोटे दावे

8 नोव्हेंबरच्या मध्यरात्री ला नोट–बंदीची घोषणा करत, पंतप्रधान मोदी असं म्हणाले की संपत्तीच्या वाढत्या असमानतेच्या विरुद्ध, भ्रष्टाचार आणि आतंकवादाच्या विरुद्ध ही एक मोहीम आहे त्यांनी असा दावा केलाय की याचा हेतू भ्रष्ट लोकांकडे जमा असलेला काळा पैसा बाहेर काढणे आणि त्याला गरीब

कष्टकरी लोकांच्या हितासाठी वापरणे असा आहे. त्यांनी सर्व हिंदुस्थानी लोकांना आवाहन केले की ह्या उच्च उद्दिष्टांसाठी 50 दिवसांपर्यंत संकटाचा सामना करा.

## पहिले असत्य :धनसंचयाची असमानता कमी करणे

मोदींच्या नेतृत्वाखालील भाजप–नीत सरकार ”खाली झिरपण्याच्या ” त्याच त्याच घिस्यापिट्या सिद्धांताचे अनुमोदन करीत आहे, ज्याला मनमोहन सिंगच्या नेतृत्वाखालील कॉग्रेस–नीत सरकारनेही बढावा दिला होता. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाला आजदेखील सर्व आर्थिक समस्या सोडविण्यासाठी रामबाण उपाय असे सांगितले जातेय. परंतु तथ्यांनी वारंवार हेच स्पष्ट होतंय की भांडवलदारीचा विकास तेजीने होत असू दे वा धीम्या गतीने, श्रीमंत आणखीन वेगाने श्रीमंत होत आहेत जेव्हा की कष्टकरी बहुसंख्यक गरीबच राहतात किंवा अधिकच दरिद्री बनत आहेत.




आकडेवारीनुसार हेच दिसून येते की देशातील कामगारवर्ग, शेतकरी आणि इतर स्वयंरोजगार कमविणाऱ्या लोकांनी निर्माण केलेली संपत्ती वर्षानुवर्षे, कमीत कमी हातांमध्ये जास्तीत जास्त संकेंद्रित होत आहे. (तक्ता 1 पहा: श्रीमंत अधिक वेगाने श्रीमंत होत आहेत). देशातील सगळ्यात श्रीमंत 1 टक्के लोक – जवळजवळ 35 लाख घराणी – यांच्या हातात देशाच्या एकुण संपत्तीचा हिस्सा 2004 मध्ये 40 टक्क्यांपासून वाढून 2014 मध्ये 49 टक्के झाला आणि हा 2016 मध्ये 58 टक्के झाला आहे. या प्रचंड वाढीचा हा अर्थ आहे की 2014 पासून श्रीमंत आणखी तेज गतीने श्रीमंत झाले आहेत, म्हणजेच संप्रग सरकार जाऊन भाजप सरकार येण्याने संपत्तीच्या असमानता वाढण्याच्या प्रवृत्तीची दिशाही बदलली नाही, आणि गतीही कमी झाली नाही.

भाजपचे विविध सिद्धांत–कार सांगतात की समृध्दी खाली झिरपुन जनसमुदायापर्यंत न पोहोचण्याचे मुख्य कारण खूप काळ टिकलेले अत्याधिक भ्रष्ट कांग्रेस पार्टीचे शासन आहे. ते या गोष्टीकडे लक्ष वेधून सांगतात की 2003 ते 2008 दरम्यान भांडवलदारी संवर्धनाचा वेग हा खूप परजीवी होता, सट्टेबाजीने निर्माण केलेल्या संसाधनाच्या फुग्यांनी प्रेरित होता तसेच मुख्यत्वे वेगवेगळ्या भ्रष्ट कार्यपद्धतीद्वारे झाला होता. ते याकडेही लक्ष वेधतात, की मनमोहन सिंगच्या पहिल्या सरकारच्या शासन काळात आर्थिक वृद्धीची जी उच्च गती प्राप्त झाली होती, ती "रोजगार विरहीत वृद्धी" होती.

भाजपच्या ह्या सिद्धांत–कारांच्या तर्कामध्ये मुख्य चूक ही आहे की ते भांडवलदारी विकासाच्या वस्तुगत नियमांकडे लक्ष देत नाहीत, या गोष्टीचे स्पष्टीकरण करत नाहीत की भांडवलशाही आपल्या सर्वोच्च आणि सर्वात परजीवी टप्प्यावर पोहोचली आहे. फक्त हिंदुस्थानातच नव्हे तर सर्वच भांडवलदारी देशांमध्ये, श्रीमंत अधिक वेगाने श्रीमंत होत आहेत. आता "गुंतवणूक करण्यायोग्य एकूण संपत्तीचा" 40 टक्क्याहून अधिक हिस्सा लोकसंख्येच्या सर्वात श्रीमंत 1 टक्के लोकांच्या हातात आहे. (तक्ता 2 पाहा: संपत्तीच्या असमान वितरण असणाऱ्या देशांमध्ये हिंदुस्थान एक देश आहे) हिंदुस्थानमध्ये एवढी जास्त असमानता यामुळे आहे की येथे भांडवलदारी शोषणासोबत, सामंतवादाचे अवशेष, वसाहतवाद आणि साम्राज्यवाद हीपाहायला मिळतो. भांडवलाचे संकेंद्रीकरण आणि त्याच्या परिणाम स्वरूप सत्तेची मक्तेदारी इथे खूप मोठ्या प्रमाणात आहे. राजनीतीक सत्तेचे संकेंद्रीकरण देखील खूप जास्त आहे. कार्यकारिणी चालविणारे भाजप असो वा कांग्रेस पार्टी, मक्तेदार भांडवलदारच देशाचा (अजेंडा) कार्यक्रम ठरवितात, आणि त्यांचा एकमात्र उद्देश आहे की आपल्या जागतिक प्रतिस्पर्ध्यांच्या तुलनेत जास्त तेज गतीने श्रीमंत बनणे.



कांग्रेस पार्टी भाजपवर कुप्रबंधनाचा आरोप लावीत आहे, तर भाजप, कांग्रेस पार्टीला वाढत्या असमानतेसाठी दोषी ठरवीत आहे. हे दोघेही वाढत्या आर्थिक असमानतेपाठी असणारे मूळ कारण लपवित आहेत. वाढत्या आर्थिक असमानतेचे मूळ कारण आहे की सामाजिक उत्पादनाच्या साधनांवर भांडवलदारांची मालकी आहे. भांडवलदारी मालकीवर आधारित उत्पादन व्यवस्था आपल्या सर्वोच्च टप्प्यावर, मक्तेदारी भांडवलशाहीच्या टप्प्यावर पोहोचली आहे. खाजगी संपत्ती खूप थोड्या विशाल मक्तेदार कंपन्याच्या हातांमध्ये एकवटलेली आहे. यामुळेच सामाजिक उत्पादनाची पूर्ण प्रकिया अधिकाधिक वृद्धी करण्यासाठीच राबविली जात आहे, ज्यासाठी कामगारांचे वेतन आणि शेतकऱ्याच्या एकूण कमाईला कमीत कमी ठेवले जात आहे.

आपल्या देशामध्ये स्वतःला ''इंडिया इंकार्पोरेटेड'' संबोधणारी मक्तेदार घराणी राज्याच्या सर्व तंत्रांवर नियंत्रण करीत आहेत आणि हे सुनिश्चित करत आहेत की राष्ट्राच्या संपत्तीचा वापर त्यांना अजून श्रीमंत बनविण्यासाठी तसेच जगातील सगळ्यात ताकतवान भांडवलदारी समूहामध्ये सामील करण्याच्या संकुचित हितांसाठी केला जावा.

गेल्या दोन आठवड्यामध्ये, मिडियामध्ये तऱ्हे तऱ्हेची परस्परविरोधी आकडेवारी व अनुमान प्रस्तुत केले गेले आहे, की नोटबंदी केल्याने केंद्र सरकार कितीतरी करोड अतिरिक्त रुपये जमवू शकेल. मुख्य प्रश्न हा नाही की किती रुपये जमवू शकेल तर हा आहे की हे रुपये कोणासाठी जमविले जात आहेत? ह्यांने कोणाचा फायदा होणार आहे आणि यासाठी कोणाकडून वसुली केली जात आहे? प्रत्येक केंद्रीय–बजेटमध्ये हेच दिसून येतंय की प्रत्येक वेळी वाढत्या कर्जाचा बोझा कष्टकरी जनसमुदायावरच लादला जातो. पण वसूल केलेल्या धनाचा वापर मात्र मुख्यत्वे मक्तेदार भांडवलदारांच्या हितासाठीच केला जातो.

"रोकड विरहीत अर्थव्यवस्था" प्रस्थापित केल्याने कामगारवर्गाची समृद्धी व सुरक्षा सुनिश्चीत होणार नाही. जर बँक खात्यामध्ये किंवा मोबाइल भुगतान खात्यामध्ये पैसेच नसतील तर त्याचा काहीएक उपयोग नाहीये. प्रत्येक कामगाराला सन्मानपूर्वक मानवी जीवन सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येकाला रोजगाराचा अधिकार, उपभोगासाठी आवश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती बरोबर वाढणारे न्यूनतम वेतन आणि सर्व वेतनभोगी कामगारांना मिळणारे सर्व मुलभूत अधिकारांची सुनिश्चिती राज्याला करावी लागेल. राज्याला शेतीसाठी लागणाऱ्या सर्व आवश्यक वस्तूंना पर्याप्त प्रमाणात शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे लागेल, आणि त्यासोबतच स्थिर आणि लाभकारी किमतीवर शेतकऱ्यांची पिकखरेदी सुनिश्चित करावी लागेल. राज्याला उदारीकरण, खाजगीकरण आणि बड्याबड्या कंपनीमार्फत होणाऱ्या भूमी–अधिग्रहणाला रोखावे लागेल.

प्रस्थापित राज्य आणि मोदी सरकार याच्या उलट दिशेत काम करीत आहेत. ते हिंदुस्थानी आणि विदेशी भांडवलदारी गुंतवणूकदारांचे हित जपण्यासाठी कामगार आणि शेतकऱ्यांच्या रोजीरोटी व अधिकारांवर हल्ले करीत आहेत.

नोट–बंदीमुळे उत्पादक शक्तींचे मोठे नुकसान झाले आहे, तसेच कामगार, शेतकरी, छोटे व्यापारी आणि अन्य स्वयंरोजगार मिळविणाऱ्यांना खूप कष्ट झेलावे लागले आहेत. भविष्यात यामुळे मुख्यत्वे मक्तेदार भांडवलदारी घराण्यांनाच फायदा होणार आहे. रियल इस्टेट सारख्या क्षेत्रांमध्ये छोट्या आणि मध्यम उद्योगांचा विनाश होऊन त्याजागी हिंदुस्थानी व विदेशी मोठ–मोठ्या मक्तेदार कंपन्या स्थापित होऊन संपत्तीच्या वाढत्या संकेंद्रीकरणाची प्रवृत्ती अजून तेज गतीने पुढे जाईल.

श्रीमंताकडून संपत्ती काढून ती गरिबांना देणे तर दूर, नोट–बंदीचा उद्देश तर याच्या उलटा आहे. नोट–बंदीचा खरा उद्देश आहे अतिश्रीमंत भांडवलदारांच्या हितासाठी मेहनतकश जनसमुदायाच्या बचतीचे धन लुटणे.

## दुसरे असत्य : भ्रष्टाचाराला संपविणे

वेगवेगळ्या भ्रष्ट कार्यपद्धतींच्या अभ्यासाचे रिपोर्ट मागील 50 दिवसांत आले आहेत. नोटबंदी ही भ्रष्टाचाराच्या विरुद्ध एक मोठी मोहीम आहे हा भ्रम त्याने चकनाचूर होतो.

देशातील काही भागांतून रिपोर्ट आले आहेत की काळ्याबाजाराचा व्यवसाय करणारे लोक काही कमिशन घेऊन जुन्या नोटा बदलून नवीन नोटा देण्याचे काम करीत आहेत. राज्यातील उच्च पदांवर बसणाऱ्या काही भ्रष्ट लोकाच्या सहयोगाने काळाबाजार करणाऱ्या लोकांना नवीन नोटा मिळाल्या आहेत. जुन्या नोटांना काही आदिवासी क्षेत्रांमध्ये घेऊन जाणे, जेथील रहिवाशांना आयकरात सूट मिळत आहे, हा धंदा पण चालू आहे.

ह्या सर्व घटनांतून स्पष्ट होतंय, की भ्रष्टाचार हिंदुस्थानी राज्यात एवढ्या खोलवर आणि विस्तृतपणे बोकाळला आहे की याच राज्याद्वारा चालविलेली भ्रष्टाचार विरोधी मोहीम एक खूप मोठा धोकाच आहे. भ्रष्ट अधिकारी आणि मंत्री रोकड विरहीत लाच घेण्याच्या क्लुप्त्याही शोधून काढतील. नोट–बंदीने भ्रष्टाचार तर मिटणार नाहीच, उलट अवैध पैसा जमविण्याचे नव–नवीन भ्रष्ट व्यवहार सुरु होतील.

आयकर विभाग, जो बँकेत जमा केलेल्या बेहिशोबी धनाचा पत्ता लावण्याचे व त्या धनाच्या मालकांकडून कर आणि दंड वसूल करण्यासाठीची एक मुख्य यंत्रणा आहे, तो विभाग स्वतःच खूप भ्रष्ट आहे.

खाजगी लाभासाठी सरकारी पदाचा गैरवापर करणे अशी भ्रष्टाचाराची व्याख्या आहे. आपल्या देशात खाजगी लाभासाठी सरकारी पदांचा वेगवेगळ्या पद्धतीने गैरवापर केला जातो आणि त्यासाठी रोकड किंवा काळ्या धनाची देवाण–घेवाण व्हावी हे जरूरी नाही.

जवळजवळ 85 मोठ्या भांडवलदारांनी सार्वजनिक क्षेत्रांतील बँकाकडून काही लाखो–करोडो रुपयांचे कर्ज घेतले आहे, जे चुकविण्यासाठी ते नकार देत आहेत. हे आजकाल सुरु असलेल्या सर्वात मोठ्या भ्रष्टाचाराच्या कांडापैकी एक आहे. हे कर्ज घेणाऱ्या कंपनीचे प्रमुख आणि राज्यातील उच्चपदस्थ पदाधिकाऱ्यांमध्ये असणारे संगनमत यावरून सुस्पष्टपणे दिसून येते.

केंद्र सरकारचे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांवर नियंत्रण आहे. पण तरीही केंद्र सरकारने त्या बँकांना मोठ्या भांडवलदार कर्जबुडव्यांची मालमत्ता जप्त करण्याचे आदेश दिलेले नाहीत. उलट समाजाच्या क्रोधापासून ह्या मोठ्या भांडवलदार कर्जबुडव्यांचे रक्षण आणि संरक्षणच केले जात आहे. रिझर्व्ह बँक तर त्यांची नावे उघडकीस आणण्यास देखिल तयार नाहीये. ही मागणी बँक कर्मचाऱ्यांच्या यूनियन्सनी दीर्घ काळापासून उचलून धरली आहे. सार्वजनिक संपत्तीचे सर्वांत मोठे दरोडेखोर ह्या सरकारप्रणित तथाकथित भ्रष्टाचार विरोधी कारवाईचे लक्ष्यच नाहीयेत. पंतप्रधान ज्या "विकसित हिंदुस्थाना"चे स्वप्न दाखवीत आहेत, ते अमेरिकेसारख्या पूर्णतः भांडवलशाही समाजाचे स्वप्न आहे. अमेरिकेतील समाजामध्ये, हिंदुस्थानच्या तुलनेत रोकडीचा कमी वापर होतो, परंतु याचा अर्थ हा नाहीये की तिथे भ्रष्टाचार कमी आहे. तिथे फक्त भ्रष्टाचाराच्या पद्धती वेगळ्या आहेत.

उदाहरणार्थ, हिंदुस्थानात भ्रष्टाचाराचे जे खास रूप दिसून येते, त्यात ह्या गोष्टीची झलक आहे की 1947 मध्ये कोणतीच क्रांती झाली नव्हती, म्हणून आपले राज्य ब्रिटीश वसाहतवादी शासनाची विरासत आहे. सरकार आणि प्रशासनाचे सर्व घटके वरपासून खालपर्यंत भ्रष्ट आहेत.

अमेरिकेमध्ये भांडवलदारांनी गृहयुद्ध करून स्वातंत्र्य मिळविले होते व एका भांडवलदारी लोकशाही राज्याची स्थापना केली होती. 20व्या शतकात हे राज्य एक साम्राज्यवादी राज्य म्हणून प्रकट होऊन

सामोरे आले आणि पूर्ण जगावर आपले वर्चस्व जमविण्याचे प्रयत्न करू लागले. या राज्यात भ्रष्टाचार उच्च स्तरावर संकेंद्रित आहे, पण खालील स्तरावर तो आढळून येत नाही.

आंतरराष्ट्रीय स्तरावर जेव्हा वेगवेगळ्या देशांची भ्रष्टाचाराबाबतीत तुलना केली जाते, तेव्हा अमेरिकेत भ्रष्टाचाराचा स्तर जागतिक सरासरी स्तराहून कमी दाखवला जातो. परंतु याचे कारण असे आहे की अमेरिकेत भांडवलदारांनी भ्रष्टाचाराच्या जवळ–जवळ सर्व पद्धतींना वैधता प्रदान केली आहे. उदाहरणार्थ, तिथे भांडवलदारी कंपन्याद्वारे निवडणुकीचे निकाल प्रभावित करणे आणि खास विधेयकांना व नीतींना समर्थन किंवा विरोध करण्यासाठी लॉबिंग कंपन्याच्या (जे त्या विधेयक किंवा नीतींच्या बाजूने किंवा विरोधासाठी समर्थन मिळविण्याचे काम करतात.) सेवांचा वापर करून निर्वाचित प्रतिनिधींना धन देणे पूर्णपणे वैध ठरविण्यात आले आहे.

भांडवलाचे जितके जास्त संकेंद्रण होते, राजनीतिक सत्ता तितकीच जास्त संकेंद्रित होत असते आणि भ्रष्टाचाराचा स्तर तेवढाच जास्त दिसून येतो.

भ्रष्टाचाराचा अर्थ आहे खाजगी लाभासाठी सरकारी पदाचा वापर करणे. या अर्थाने पाहिले तर अमेरिकन समाज सर्वात जास्त भ्रष्ट समाज मानला जाऊ शकतो, ज्यात सामाजिक जीवनातील सर्व पैलूंवर मक्तेदार भांडवदारांचे संपूर्ण वर्चस्व आहे. सार्वजनिक क्षेत्रांमध्ये बड्याबड्या अरबपती धनिकांच्या खाजगी हिताचेच वर्चस्व आहे. राजनीतिक प्रकियेत या अरबपतींच्या पैशाच्या आधारावर उभ्या असलेल्या दोन्ही पार्ट्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही पार्टीला कोणतेच स्थान नाहीये.

भ्रष्टाचाराला संपविणारी मोहीम होणे तर दूरच, उलट नोट–बंदी स्वतःच खूप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचा एक मामला आहे, कारण की स्वार्थी व संकुचित खाजगी हितांसाठी एक मुख्य सार्वजनिक निर्णय घेतला गेला आहे. प्रभावशाली मक्तेदार भांडवलदार घराण्यांच्या प्रमुखांनी, बंद दरवाजांच्या पाठीमागे हा निर्णय घेतलाय, आणि त्यानंतर पंतप्रधानांना तो लागू करण्याचे तसेच जनतेच्या हिताची मोहीम अश्या रुपात त्याचा प्रचार करण्याचे काम सोपविले आहे. अंतिम टप्प्यात या योजनेला मंत्रिमंडळासमोर प्रस्तुत करण्यात आले. मग भारतीय रिझर्व बँकेच्या बोर्डाची स्वीकृती मिळविली, ज्याचे सदस्य काही हिंदुस्थानी व विदेशी भांडवलदारी कंपन्याप्रती निष्ठावान असलेले उच्च अधिकारी व काही ठराविक "विशेषज्ञ" आहेत.

## तिसरे असत्य : दहशतवादाचा सामना करणे

8 नोव्हेंबर ला नोट–बंदीची घोषणा करताना पंतप्रधान म्हणाले की, विदेशी शक्ती हिंदुस्थानात दहशतवादी कृत्ये करविण्यासाठी नकली नोटांच्या स्वरुपात पैसा पुरवितात आणि नोट–बंदीचा उद्देश त्या नकली नोटा हटविणे आहे.

जागतिक स्तरावर दहशतवाद आयोजित करणाऱ्या शक्ती पैसा पुरविण्यासाठी अनेक आधुनिक साधनांचा वापर करतात. दहशतवादी कृत्यांना लागणारा पैसा पुरविण्यासाठी त्या नकली नोटांवर बिलकुल अवलंबून नाहीत. या व्यतिरिक्त सरकारच्या स्वतःच्या अनुमानानुसारही, चलनात असलेल्या नकली नोटांचे एकूण मूल्य फक्त 400 करोड रुपये आहे. जेव्हा की 15 लाख करोड रुपयांच्या जुन्या नोटा चलनातून बाद ठरवण्यात आल्या आहेत. म्हणजे 3000 नोटांपैकी एकापेक्षाही कमी असे नकली नोटांचे प्रमाण आहे.

जर दहशतवादा विरुद्ध अभियान गंभीरतेने चालवायचे असेल तर त्याचा निशाणा त्या प्रमुख व सर्वात शक्तिशाली राज्यावर व्हायला हवा जे या भूभागात दहशतवादी कृत्ये आयोजित करत आहे. खूप सारे पुरावे हे दाखवितात की, दक्षिण आशिया समवेत जगातील अनेक देशांत आणि प्रदेशांत क्रियाशील हत्यारबंद दहशतवादी गटांचे सर्वात मोठे संघटक आणि त्यांना पैसा पुरविणारे अमेरिकन राज्य आणि त्याच्या गुप्तचर एजेन्सीच आहेत.

गुप्तरीतीने दहशतवादाचे आयोजन करून तसेच दहशतवादाशी लढण्याच्या नावाखाली खुलेआमपणे युद्ध पुकारून, अमेरिकेने स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या इराद्याने, अनेक राष्ट्रांना उद्ध्वस्त केले आहे आणि आणि अनेक प्रदेशांचे विभाजन केले आहे. ज्या–ज्या देशांची सरकारे अमेरीकेची साथ करायला नकार देतात, त्या सर्व देशांना दहशतवादी हल्ल्यांचा संभावित निशाणा बनविले जातेय आणि त्या देशांमध्ये बाहेरून गृहयुद्ध भडकाविण्याचा प्रयत्न केला जातोय व किंवा त्या देशात "लोकशाही समर्थक" व "भ्रष्टाचार विरोधी" आंदोलने चिथावली जात आहेत.

जेव्हा जेव्हा हिंदुस्थान आणि पाकिस्तानची सरकारे आपापसांत मिळून काही पावले उचलण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा तेव्हा अमेरिका व तिच्या मित्र राष्ट्रांच्या गुप्तहेर एजेन्स्या दहशतवादी हल्ले आयोजित करतात. याचा हाच परिणाम होतोय की हिंदुस्थान आणि पाकिस्तान नेहमीच एक–दुसऱ्या बरोबर लढाई करत असतात आणि एकमेकांविरुध्द अमेरिकेचे समर्थन मागत राहतात.

अमेरिकी साम्राज्यवाद आणि आशियावर वर्चस्व जमविण्यासाठीच्या त्याच्या हल्लेखोर कृतींमुळे आपल्या देशासमोर जे संकट आहे, त्यापासून देशाची रक्षा करणे सोडून, हिंदुस्थानचे सरकार अमेरिकेसोबत रणनैतिक गठबंधन बनवू इच्छित आहे, आणि दहशतवादाच्या या सर्वात खतरनाक आयोजकाबरोबर गुप्तहेर व लष्करी सहयोग आणखी मजबूत बनवत आहे. अशा तऱ्हेने हे सरकार आपल्या देशाला आणखीन जास्त संकटात ढकलत आहे.

ज्या तऱ्हेने अमेरिका दहशतवादाशी लढण्याच्या बहाण्याने स्वतःच्या हल्लेखोर, आणि कब्जाकारी युद्धांना वैधता देण्याचे प्रयत्न करीत आहे, ठीक तसेच हिंदुस्थानचे शासक दहशतवादाचा विरोध करण्याचा बहाणा देऊन कष्टकरी जनसमुदायावर वित्तीय काटकसर लादत आहेत.

नोट–बंदीचा खरा उद्देश दहशतवादाशी लढाई करण्याचा नाही किंवा भ्रष्टाचाराशी लढण्याचाही नाही. यामागील खरा हेतू गरिबांच्या हितासाठी राष्ट्राचे धन वापरणे हा देखील नाही. याचा खरा उद्देश आहे जनतेला आपले बचतीचे सर्व पैसे बँकात जमा करण्यासाठी आणि डिजिटल देवाण–घेवाण करण्यासाठी मजबूर करणे, ज्यामुळे फक्त देशातील सर्वात श्रीमंत आणि सर्वात मोठ्या भांडवलदारांना याचा लाभ होईल. संपूर्ण जनतेच्या बचतीच्या पैशांना मक्तेदार भांडवलदारांच्या नियंत्रणाखाली आणणे हेच याचे अंतिम उद्दिष्ट आहे.

हिंदुस्थानी व विदेशी मक्तेदार वित्तपुंजीच्या अजेंड्याचा नोट–बंदी हा एक घटक आहे. भांडवलदार अरबपतींच्या संकुचित उद्दिष्टांसाठी, कष्टकरी लोकांच्या रोजीरोटी आणि अधिकारांवर हा एक हल्ला आहे.

## खऱ्याखुऱ्या उपायाच्या दिशेने

मिडीयावर नियंत्रण असणाऱ्या मक्तेदार भांडवलदारी कंपन्या, नोटबंदीच्या विरुद्ध जनतेच्या वाढत्या रोषाला आणि प्रतीरोधाला जाणूनबुजून लपवत आहेत. देशातील अनेक भागांमध्ये लोकांनी रागाच्या भरात ए.टी. एम. मशीन आणि बँकेच्या शाखांवर हिंसक हल्ले केले आहेत.

वित्तीय काटकसरीच्या या कार्यक्रमा विरुद्धच्या संघर्षात बँक कर्मचाऱ्यांनी मध्यवर्ती भूमिका निभावली आहे. ते नोटबंदीच्या सर्वात दयनीय पीडितांमध्ये आहेत कारण त्यांना बिना मोबदला तासनतास ओवरटाईम काम करावे लागले आहे. याव्यतिरिक्त त्यांना जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागले आहे आणि त्या खोट्या प्रचाराचाही सामना करावा लागत आहे की नवीन नोटांवरील बंदी तोडण्यासाठी आणि काळ्याबाजारात नवीन नोटा विकण्यासाठी बँक कर्मचारी जबाबदार आहेत.

बँक कर्मचाऱ्यांच्या युनियन काही वर्षांपासून मोठ्या भांडवलदारांच्या "वित्त क्षेत्रातील सुधाराच्या" अजेंड्याविरुद्ध निर्धाराने संघर्ष करीत आहेत. कर्ज बुडविणाऱ्या सर्वात मोठ्या भांडवलदारांविरुद्ध कठोर पावले उचलण्याची मागणी त्यांनी केली आहे आणि ठामपणे असा दावा केलाय की बुडलेल्या कर्जाच्या समस्येला सोडविण्याचा बँकांकडे हाच एक वैध उपाय आहे. त्यांनी सर्व प्रकारच्या खाजगीकरणाला विरोध केला आहे आणि मागणी केली आहे की समाजाच्या सार्वत्रिक हिताची पूर्तता करणे हेच बँकेचे काम असायला हवे. आज बँक कर्मचाऱ्यांच्या युनियन अशी मागणी करत आहेत की भारतीय रिझर्व्ह बँकेने नोटबंदीच्या बाबतीत सत्य लपविणे बंद केले पाहिजे. त्यांनी मागणी केली आहे की कोणत्या बँकेला किती नवीन नोटा पुरविल्या गेल्या आहेत आणि येत्या महिन्यांमध्ये आणखी किती नवीन नोटा पुरवठ्याची योजना आहे, याबाबतीत संपूर्ण माहिती दिली गेली पाहिजे.

हिंदुस्थानची कम्युनिस्ट गदर पार्टी बँक कर्मचाऱ्यांच्या संघर्षाला आणि मागण्यांना न्याय्य मानते, आणि सर्व पार्ट्यांना तसेच कामगार, शेतकरी, महिला आणि नौजवानांच्या सर्व संघटनांना आवाहन करते की त्यांनी बँक कर्मचाऱ्यांना बिनशर्त पूर्ण समर्थन द्यावे. मक्तेदार भांडवलशाही बँकिंगच्या जागी "सामाजिक बँकिंग" प्रस्थापित करणे, हे आपल्या समाजाच्या समस्यांना खऱ्या अर्थाने सोडवण्याच्या कार्यक्रमाचा एक मुख्य भाग आहे.

कष्टकरी बहुसंख्येच्या बचतीच्या धनासहित, देशाच्या सगळ्या वित्तीय संसाधनांना सामाजिक नियंत्रणाखाली आणले पाहिजे आणि खाजगी शोषकांद्वारे होणाऱ्या लुटीपासून त्याला वाचविले पाहिजे. कामगारांनी, शेतकऱ्यांनी, महिलांनी आणि नौजवानांनी बँकेतील जमा आपल्या धनाच्या सुरक्षिततेची मागणी करायला हवी आणि यासाठी कायदा बनविण्याची मागणी करायला हवी. बड्या भांडवलदारांनीच सार्वजनिक क्षेत्रांतील बँकांना संकटात ढकलले आहे. त्याची त्यांच्याकडूनच वसुली करायला हवी, कष्टकरी जनतेकडून नव्हे.

*कर्ज न चुकविणाऱ्या भांडवलदारांकडून वसुली करा!*कामगार वर्ग आणि लोकांवर थोपलेल्या वित्तीय काटकसरीच्या विरोधात एकजूट संघर्षाचा हाच नारा आहे.

गतवर्षीच्या सप्टेंबरमध्ये उदारीकरण, खाजगीकरण, आणि बड्या कंपन्यांद्वारे भूमी अधिग्रहणाच्या विरुद्ध आयोजित करण्यात आलेल्या सार्वत्रिक संपात 17 करोड हून अधिक कामगार सहभागी झाले होते. वर्तमान स्थितीमध्ये मजदूर कामगार वर्गाच्या एकजूट विरोधाला अजून मजबूत करण्याची तसेच आणखी तीव्र करण्याची गरज आहे. यासाठी बड्या भांडवलदारांच्या हल्ल्यांविरोधात कामगार, शेतकरी आणि सर्व कष्टकरी लोकांची एकता बनवून ती मजबूत करावी लागेल.

कम्युनिस्ट गदर पार्टी सर्व कम्युनिस्टांना, सर्व पार्ट्यांना तथा कामगारांच्या, शेतकऱ्यांच्या, महिलांच्या आणि नौजवानांच्या सर्व संघटनांना आवाहन करते की त्यांनी अर्थव्यवस्थेला एक नवीन, मानवकेंद्रित दिशा देण्याच्या कार्यक्रमाभोवती एकजूट व्हावे. नोट–बंदीच्या बाबतीत सत्याला समोर आणणे आणि याबाबतीत पसरविलेल्या असत्याचे खंडण करण्यासाठी आपण एकजूटीने अभियान सुरु करायला हवे.

आपल्याला भांडवलदारी संसदीय राजनीतीच्या जाळ्यात अडकायचं नाहीये. आपले ध्येय भाजपच्या जागी कांग्रेस पार्टी किंवा अन्य भांडवलदारी पार्ट्यांच्या कोणत्यातरी युतीला सत्तेवर बसविणे हे नाहीये. आपले ध्येय आहे भांडवलदारांच्या शासनाच्या जागी, सर्व कष्टकरी आणि आजवर उत्पीडीत असणाऱ्या लोकांसोबत युती बनवून, कामगार वर्गाचे शासन प्रस्थापित करणे.

संपत्तीची वाढती असमानता तेव्हाच संपुष्टात येईल ज्यावेळी मोठे उत्पादन करणाऱ्या आणि विनिमयाच्या साधनांना मक्तेदार भांडवलदारांच्या हातातून हिसकावून घेतले जाईल आणि त्यांना जनतेच्या हितासाठी वापरण्याकरता सार्वजनिक संपत्ती मध्ये बदलले जाईल.

भ्रष्टाचाराचा अंत तेव्हाच होईल, जेव्हा वसाहतवादाचा वारसा असलेले प्रस्थापित राज्य संपुष्टात आणून त्याच्या जागी एक नवीन राज्य प्रस्थापित केले जाईल, ज्यात निर्णय घेण्याचा अधिकार कामगार वर्गाच्या नेतृत्वाखालील जनसमुदायाच्या हातात असेल.

दहशतवादाचा अंत तेव्हाच होईल जेव्हा सी.आई.ए. च्या सगळ्या कारवाया कायमच्या बंद केल्या जातील आणि अमेरिकन साम्राज्यवादाला दक्षिण आशियातून मुळापासुन उपटून टाकले जाईल.

कम्युनिस्ट गदर पार्टीचे प्रामाणिक मत आहे की आपल्या समोर सर्वात महत्त्वाचे काम आहे त्या संपूर्ण क्रांतीची तयारी करणे, जी आपल्या समाजाला सर्व प्रकारच्या शोषणापासून, दमनापासून, परजीवितेपासून, भ्रष्टाचारापासून आणि मानव सन्मानाच्या व अधिकारांच्या उल्लंघनापासून मुक्त करण्यासाठी खूप गरजेची आहे.

क्रांतीची तयारी करण्याचा अर्थ आहे कष्टकरी जनसमुदायाच्या एकजूट संघर्षाच्या संघटना निर्माण करणे व मजबूत करणे. या संघर्ष संगठनांमध्ये कामगार एकता समित्या, कामगार – शेतकरी समित्या आणि रहिवाशी भागातील लोकांना सत्तेत आणणाऱ्या समित्या सामील आहेत. राजनीतिक एकतेच्या या सर्व संघटना बनवणे आणि त्या मजबूत करणे खूप महत्त्वाचे आहे कारण हे सर्व त्या नवीन राजनीतिक सत्तेचे संभाव्य तंत्र आहे ज्याची स्थापना करणे खूप गरजेचे आहे.

हिंदुस्थानच्या नवनिर्माणाच्या आपल्या स्वतःच्या पर्यायी कार्यक्रमाभोवती आपण एकजूट होऊया. हा एक नवे राज्य आणि राजनैतिक प्रकिया स्थापित करण्याचा कार्यक्रम आहे, ज्यामुळे लोक सत्तारूढ होतील आणि अर्थव्यवस्थेला सर्वांच्या गरजांची पूर्तता करण्याची नवी दिशा दिली जाईल.

चला, आज आपण संघर्षाला अषा क्रांतीच्या दिशेने पुढे नेऊया, जी सर्व प्रकारचे शोषण, दमन, भ्रष्टाचार, भेदभाव आणि मानव सन्मान व अधिकारांचे हनन ह्यांना पूर्णतः संपवून टाकेल.

**इंकलाब झिंदाबाद!**